## युवक महोत्सव स्थानिक संयोजन समिती

युवक महोत्सवाचे यशस्वी संयोजन व संचालन होण्याकरिता एक स्थानिक संयोजन समिती खालीलप्रमाणे नियुक्त केली जाईल.

१. संयोजक महाविद्यालयाचे प्राचार्य — अध्यक्ष

२. महाविद्यालयातील सांस्कृतिक विभागाशी संबंधित असणारा एक प्राध्यापक संयोजक महाविद्यालयाच्या प्राचार्यांकडून नियुक्त केला जाईल. आणि तो या समितीचा सचिव असेल.

३. पाच प्राध्यापक (संयोजक प्राचार्यांकडून नियुक्त — सदस्य
दोन महिला व तीन पुरुष)
(साधारणत: शारीरिक शिक्षण, एन.सी.सी., एन.एस.एस. विभागातील संबंधित प्राध्यापकांमधून
एकाची नियुक्ती संयोजक प्राचार्य करतील.)

४. एक प्राध्यापक — सदस्य
(सांस्कृतिक विभाग/स्थानिक कर्मचारी कल्याण समितीचा प्रतिनिधी)

५. संयोजक महाविद्यालयाच्या विद्यार्थी परिषदेचे प्रतिनिधी — सदस्य

## संयोजन समितीच्या कामाचे स्वरूप:

१. सहभागी व परीक्षकांच्या निवासाची व्यवस्था करणे.

२. स्पर्धेसाठी पाच मंचांची व्यवस्था करणे, आवश्यक सभागृह तयार करून घेणे, भाडे ठरविणे, बैठक व्यवस्था करणे.

३. आवश्यक स्पर्धा साहित्याची खरेदी करणे.

४. निमंत्रण पत्रिका तयार करणे.

५. महत्त्वाच्या व्यक्तींना कायक्रमांची निमंत्रणे देणे.

६. अडचणींच्या प्रसंगी आवश्यक वाटल्यास स्पर्धा केंद्र बदलणे.

७. विविध कलेच्या स्पर्धा एकत्र घेणे शक्य नसल्यास पर्यायी ठिकाणी ह्या स्पर्धा विभागून घेणे आणि त्यांचे नियंत्रण करणे.

८. स्पर्धा सुरू होण्यापूर्वीची आयोजनासंदर्भातील कामे, स्पर्धा सुरू असतानाची आयोजनासंदर्भातील कामे, स्पर्धा संपल्यानंतरची आयोजनासदंर्भातील कामे करणे.

९. आवश्यक ती पदके तसेच स्मृतिचिन्हे तयार करून घेणे.

१०. स्पर्धेच्या ठिकाणी वादाचे प्रसंग होवू नयेत म्हणून प्रयत्न करणे.